पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ८

**सभावृत्तांत**

दिनांक - **११/०९/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षीक सभा **मंगळवार** दिनांक **११/०९/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.सुलक्षणा राजू धर
६. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी, मा.चव्हाण, मा.मोरे – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.४) मौजे सांगवी येथील स.न.५० व ५१ मधील मंजूर विकास योजनेतील १८ मी. रुंद रस्त्याबाबत – मा.सुरेश भोईर, मा.निर्मला गायकवाड याचा प्रस्ताव.

विषय क्र.५) आरक्षण क्र.७१ स.नं.१०६ पिंपरी येथील माध्यमिक विद्यालयाचे आरक्षणाच्या जागेचे भूसंपादन करणेबाबत – मा.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१५ दि.२८/०८/२०१८ रद्य करुन फेरसादर करणेबाबत – मा.वैशाली घोडेकर, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) मा.शहर सुधारणा समितीची सभा आयोजनाबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २८/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ११/०९/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.सुरेश भोईर

संदर्भ: मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय - मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ११/०९/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ११/०९/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक ०३ चा विचार दिनांक १२/१२/२०१८ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ११/०९/२०१८

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा.सुरेश भोईर, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव –

मौजे सांगवी येथील स.नं.५० व ५१ मध्ये मंजूर विकास योजनेत १८ मी.रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे. मिळकतधारक सदर रस्त्याखालील जागा मनपाच्या ताब्यात देत नसल्याने मनपाने सदर रस्त्याखालील जागा ताब्यात घेण्यासाठी मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे

भूसंपादन प्रस्ताव दाखल करणेत आला आहे. तथापि त्यास बराच कालावधी झाला आहे. आता मिळकतधारक खाजगी वाटाघाटीने जागा ताब्यात देण्यास तयार झाले असून काही मिळकत धारकांनी प्रपत्र ब अन्वये जागा ताब्यात दिली असून जागेवर रस्ता विकसित करण्याचे काम चालू आहे. बाधित मिळकतधारकांच्या जागेचे क्षेत्र खुप कमी असून त्यांची मोजणी करण्यासाठी पैसे भरण्यासारखी आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे सदर मिळकतधारकांच्या जागेची मोजणी मनपाने करावी व त्यांना खाजगी वाटाघाटीने देय होणा-या मोबदल्यामधून सदर रक्कम वसुल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ०५

दिनांक - ११/०९/२०१८

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : मा.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

पिंपरी येथील आरक्षण क्र.७१ स.नं.१०६ हे आरक्षण माध्यमिक विद्यालयासाठी आरक्षित असून पिंपरी येथील माध्यमिक शाळेची निकड पाहता सदर आरक्षणाची जागा त्वरित भूसंपादन करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ११/०९/२०१८

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.सुरेश भोईर

संदर्भ : मा.वैशाली घोडेकर, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्रमांक १५ दि.२८/०८/२०१८ हा रद्द करुन विभागामार्फत समितीसमोर फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ०७

दिनांक - ११/०९/२०१८

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सभेने त्यांची दर बुधवारी दुपारी २.०० वाजता होणारी साप्ताहिक सभा दर मंगळवारी दुपारी २.०० वाजता आयोजित करणेबाबत ठराव मंजूर केलेला असल्याने मा.शहर सुधारणा समिती सभेची प्रत्येक महिन्याचे २ –या व ४ थ्या मंगळवारी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात येणारी सभा प्रत्येक महिन्याचे २ –या व ४ थ्या बुधवारी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सीमा दत्तात्रय चौगुले)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५९९/२०१८
दिनांक : १२/०९/२०१८



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.